# राशिभविष्य - ऑक्टोबर, २०११.

**दादा दामले (dadadamle@hotmail.com)**

==================================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात आर्थिक व्यवहार अत्यंत सावधानतेने व विचारपूर्वकच करावेत. माणसे ओळखता आली पाहिजेत. गोड बोलण्याला व खोट्या कौतुकाला भाळू नका. नपेक्षा कठिण प्रसंगाला तोंड द्यावे लागेल. मित्र म्हणविणाऱ्या कुमार्गी लोकांपासून सावध राहा. या राशीच्या ज्या मंडळींना वाममार्ग धन सहज मिळणे शक्य आहे त्यांनी त्या मार्गाचा अवलंब टाळावाच. कौटुंबिक जीवनात गैरसमजाने वाद, भांडणे होण्याची शक्यता आहे. तसेच या राशीच्या काही जणांना राहत्या जागेच्या समस्येला किंवा स्थावरसंबंधी कटकटींना सामोरे जावे लागेल. नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने महिन्याचा पूर्वार्धच थोडा अनुकुल असणार आहे. उत्तरार्धात सर्व प्रकारच्या आरोग्यविषयक समस्यांना तोंड द्यावे लागेल. तसेच दांपत्यजीवनात वाद, मतभेद यांमुळे अस्वस्थ वाटेल. जपा. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्रहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईलसे दिसते. स्त्री-मोहामुळे काहींचा धननाश होणेही शक्य आहे. लोखंड-पोलाद, कोळसा व्यापारी,  व वकिली, अकौंटन्सी व्यवसाय असणारांना काळ अनुकुल वा लाभदायक होईल. या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या गुरुमुळे महिन्याच्या पूर्वार्धात सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहीलसे दिसते. सर्ब प्रकारचे बौद्धिक व्यवसाय क्षेत्र व शास्त्रीय संशोधन क्षेत्र असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. काहींना नोकरीत बढती मिळेल.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना  सर्व प्रकारच्या नोकरी-व्यापार-व्यवसायाच्या दृष्टीने या महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण कलात्मक व्यवसायाच्या दृष्टीने मात्र या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फ़ारसा अनुकुल असण्याची शक्यता कमी आहे. कारण कला क्षेत्रातील मंडळींना सतत कसली तरी चिंता, दु:ख, भांडणतंटे, कोर्टप्रकरणे अशापैकी त्रास सहन करावा लागेलसे दिसते. यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते, आर्किटेक्चर, मानसिक रोगतज्द्न्य, द्रव पदार्थांचे व्यापारी असे व्यवसाय असणाऱ्या सर्वांना  काळ बराच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. अध्यात्माकडे ओढा असणारांना आध्यात्मिक उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल. तसेच सामाजिक कार्याची आवड व ओढ असणारांना सामाजिक कार्यात प्रगती करणे शक्य होईल. इतर सर्व प्रकारची नोकरी वा व्यापार-व्यवसाय करत असणारांच्या नोकरी-व्यवसायात अस्थिर परिस्थितीच निर्माण होणे संभवते. कौटुंबिक जीवनात व दाम्पत्यजीवनात  काहीही कारणाने सुखापेक्षा मनस्तापच अधिक होण्याची शक्यता आहे.  मित्रांशी भांडणे, शत्रुत्व निर्माण होऊ शकेल. मुलांपैकी कोणास कसला तरी त्रास होत असल्याने संततिसुखातही बाधा येणे शक्य आहे. तसेच या राशीच्या विद्यार्थ्यांना आळस, जडत्व येऊन निरुत्साही स्थिती होईल. त्यामुळे मनपासून अभ्यास करणे अशक्य होईल. जपा.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात आवश्यक अर्थप्राप्तीसाठी खूप कष्ट-परिश्रम करावे लागणार आहेत; असे दिसते. पैसे येणे असतील तर त्यात घोटाळे, विलंब होणे संभवते. पैसे देणे मात्र त्वरित करावेच लागेल. त्याशिवाय अनपेक्षितपणे आर्थिक जाबाबदारी येऊन पडण्याची शक्यताही नाकारता येत नाही. अशा मनस्तापामुळे व श्रम-दगदगीमुळेच शारीरिक उष्णता भडकून डोळे, घसा, मान, दाढा यांचे आजार त्रस्त करतील. त्याशिवाय महिन्याच्या पूर्वार्धात रवि-

शनि ग्रहांची प्रतिकुलता त्यात भर घालेल व त्यामुळे मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा पडेल. नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेल. पण गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व काळाची प्रतिकुलता सुसह्य होईल. या राशीच्या ज्या मंडळींचा परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध असेल अशांना अशा संबंधामुळेच आर्थिक लाभ संभवतात.या राशीच्या काहीजणांचा स्वभाव लहरी होणे संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. अध्यात्मात विशेष रुचि असणाऱ्या या राशीच्या मंडळींना उपासनेत प्रगती होऊन सात्विक सुखशांती लाभेल. काहींना सूचक स्वप्ने पडतील. काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या हर्षलमुळे उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ प्रगतिकारक होईल व अनपेक्षित लाभ होणेही संभवते. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने इच्छा आकांक्षा पूर्ण होतील.

(४) **कर्क -** या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या अतिशय तापट, हेकट, हट्टी, उद्धट, मानापमान फ़ार असणारा असा झाला असावा, असे वाटते. त्यामुळेच उगाचच श्रम, दगदग होऊन आरोग्य बिघडण्याची शक्यता दिसते. अशा स्वभावामुळे नोकरी-व्यवसायातही प्रतिकुल वातावरण निर्माण होईल. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या रविमुळे महिन्याच्या पूर्वार्धात शासकीय, निम-शासकीय नोकरी असणारांना काल अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. त्याशिवाय शनिमुळे वकिली, अकौंटन्सी, सल्लागारी व्यवसाय असणारांना व शैक्षणिक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडून अधिक अर्थलाभ होईल. साहित्य-कला क्षेत्रातील मंडळींनाही काल लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात बागाईत शेती व्यवसाय असणारांना काळ लाभदायक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती पालटेल व मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. पण शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व होणारा मनस्ताप विरून जाईल. दलाली, कमिशनवर चालणारा ज्यांचा व्यवसाय असेल, त्यांना काळ लाभदायक होईल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे. काहीही कारणाने संततिसुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. जपा. जलभय, विषभय असून काहींना दूरच्या प्रवासाची तर काहींना परदेशगमनाची संधी प्राप्त होईल. दशमातील गुरुमुळे या राशीच्या काहींना नवे कार्यक्षेत्र मिळेल तर काहींना मानसन्मान प्राप्त होईल.

(५) **सिंह -** या राशीच्या मंडळींनो, थोडे सहनशील व्हा, मन व बुद्धीवर नियंत्रण ठेवा. विनम्रतेचे आचरण करा. " महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती " हे तुकोबांचे वचन सतत ध्यानात ठेवा. त्यामुळे शनि ग्रहाच्या साडेसातीचा उर्वरित दीड महिन्यांचा काळ व्यतीत झाला की अनुकुल काळाचा सूर्योदय होणारच आहे, ही गोष्ट लक्षात ठेवा. सध्या या राशीच्या मंडळींना एकूण सर्व ग्रहमान प्रतिकुलच आहे. केवळ शुभ ग्रह गुरु-शुक्राच्या अनुकुलतेनेच आपण हा विपरीत काळ सहज तरून जाणार आहात. सतत मन अस्वस्थ राहील. मनाविरुद्ध घटना घडतील. शारीरिक उष्णता भडकून उष्णतेचे आजार बळावतील. अशा परिस्थितीत कौटुंबिक सुख, गृहसौख्य व दांपत्यजीवनातील सुख यांतही गैरसमज, वाद, भांडणे, मतभेद यांमुळे भरच पडेल. काळपुरुष सत्वपरीक्षा पाहात आहे, असे समजून सर्व काही मुकाट्याने सहन करा. काळपुरुषाच्या सत्वपरीक्षेत उत्तीर्ण झालात की तोच प्रसन्न होऊन " देता किती घेशिल दो करांनी " अशी अवस्था निर्माण करील.. अशा परिस्थितीत या

महिन्याच्या उत्तरार्धात रवि-गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने नोकरी-व्यवसायात अनुकुल व लाभदायक घटना घडतील व मनाला दिलासा वाटेल. संततिसुख लाभेल. या राशीच्या विद्यार्थ्यांनी मन व बुद्धी स्थिर ठेवून मनापासून अध्ययन केले तरच गुरुकृपेने ते अपेक्षित प्रगती साधू शकतील व यश मिळवू शकतील. सतत सावधान राहा.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा सर्वच काळ अनारोग्यकारक ठरण्याची शक्यता आहे. कुटुंबातील कोणाचे स्थलांतर, स्वत:चे व जीवनसाथीचे अनारोग्य, नियोजित कार्यात येणारे अडथळे, अडचणी, वाढता खर्च, फ़सवणूक अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. पण शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व प्रतिकुल काळ थोडा सुसह्य होईल. सामान्य नोकरी-व्यवसाय असणाऱ्या या राशीच्या मंडळींना अतिशय कष्ट-परिश्रम करूनच आवश्यक अर्थप्राप्ती करून घ्यावी लागेल. इतरांना काळ अनुकुल होईल. लोखंड-पोलाद-कोळसासंबंधी व्यापार-व्यवसाय असणारांना व वकिली, सल्लागारी, अकौण्टन्सी, आर्किटेक्चर असे कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या काहींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील व उगीचच आपल्याला काही आजार झाल्याची भावना होईल व त्यामुळे नैराश्य येईल. या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी गैरसमजाने किंवा संशयाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या ज्या मंडळींची कोर्टप्रकरणे असतील त्यांनी ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. जीवनसाथीचे आचरण लहरी होईल व त्यामुळे दांपत्यजीवनात मतभेद, भांडणे होतील. जपा. अशा परिस्थितीत या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग असतील त्यांना धनलाभ वा वारसाहक्काने धन मिळण्याची शक्यता आहे. केतुमुळे संततिसुखात बाधा संभवते. श्रद्धा असेल तर हनुमान उपासना अनुकुल होईल.

(७) तुळा - या राशीच्या मंडळींना या महिन्याचे ग्रहमान फ़ारसे अनुकुल नाहीच असे म्हणावे लागते. त्यात या राशीच्या मंडळींचे मन सध्या अति भावनाशील झाले असण्याची दाट शक्यता आहे. म्हणून जर अध्यात्मात रुचि असेल तर आध्यात्मिक उपासनेस काळ अनुकुल होईल व त्यामुळे मन:शक्तीही वाढेल. कोणत्याही गूढशास्त्राची आवड असेल तर त्यावरील संशोधनात यश येईल. हर्षलमुळे या राशीच्या मंडळींचे मन अति चंचल व अस्थिर झाले असावे, असे दिसते. अति विचार करू नका. डोकेदुखीचा किंवा मेंदूविकाराचा त्रास होईल. किंवा मुदतीचा ताप येणेही शक्य आहे. जपा. पण हाच हर्षल उच्च बौद्धिक संशोधनकार्यास पूरक होईल. नोकरी-व्यवसायात या राशीच्या मंडळींना नोकरीत कष्ट, परिश्रम व दगदगच अधिक होईल व वरिष्ठांशीमन शांत मतभेद, भांडणेच होतील. स्वतंत्र व्यावसायिकांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील. या राशीच्या काहींना नवीन काही तरी करावेसे वाटेल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींना विवाहयोग संभवतो. काहींचे नवे स्नेहसंबंध जुळतील. आर्थिक लाभही संभवतात. ही राशी शनि ग्रहाची उच्च राशी असल्याने इतर राशीच्या मंडळींना जो साडेसातीचा त्रास सहन करावा लागतो तितका ग्रास, मनस्ताप या राशीच्या मंडळींना होणार नाही. मन शांत ठेवा, अति विचार करू नका, सहनशील होऊन आचरण करा. सर्व सुखाचेच होईल.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींना रवि-बुध हे दोन ग्रह महिन्याच्या पूर्वार्धातच अनुकुल होतील. उत्तरार्धात मनाविरुद्ध घटना घडून मनस्ताप सहन करावा लागेल. शनि वकिली, अकौण्टन्सी,

सल्लागारी व्यवसायांना तर हर्षल उच्च शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण या राशीच्या मंडळींना संततिविषयक समस्येला सामोरे जावे लागेलसे दिसते. शुक्रामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल; व हाच शुक्र कलेच्या क्षेत्रातील मंडळींना प्रगतिकारक व लाभदायक होईल. नेपच्यूनमुळे घरगुती बाबतीत घोटाळे, गैरसमज निर्माण होणे शक्य आहे. जपा. केतुमुळे या राशीच्या मंडळींचे मन अस्थिर राहील व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या गुरुमुळे शारीरिक आरोग्य उत्तम राहील व इतर मनोनुकुल घटना घडतील. तरीही या राशीच्या काहींना वातविकाराचा त्रास होणे शक्य आहे. आवश्यक असेल तरच प्रवास करा. कारण या राशीच्या भग्यस्थानी असलेल्या मंगळामुळे प्रवासात त्रास व मनस्ताप होण्याची शक्यता दिसते. श्रद्धा असेल तर गणेश उपासना अनुकुल होईल.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात मंगळ व हर्षल सोडून इतर सर्व ग्रह अनुकुल व लाभदायक होतील. हर्षलमुळे स्वभाव विक्षिप्त होईल व कोणाशी पटवून घेणे जमणार नाही. त्यामुळे आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणे शक्य असूनही. अशा स्वभावामुळे वास्तुसुखही लाभत नाही. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या मंगळामुळे मानसिक-शारीरिक कष्ट होऊन शारीरिक उष्णता भडकेल व उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागेल. अपघातभय असून हाडमोड होणे संभवते. नियोजित कार्यात अपयश आल्यामुळे गहरे नैराश्य येईल. जलभय, वीजभय आहे. जपा. रवि-बुध-शुक्राच्या अनुकुलतेमुळे शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना बढती, मानाचे पद असे लाभ होण्याची शक्यता आहे. वरिष्ठांकडून कामाचे कौतुक होईल. वकिली-सल्लागारी व्यवसाय, अकौंटन्सी, आर्किटेक्चर, सर्व प्रकारचे कला व बुद्धी यांचा संगम असलेले कलत्मक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. गुरु ग्रह संततिसुखास अनुकुल होईल व या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीसही अनुकुल होईल. नेपच्यूनमुळे या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. अध्यात्म, गूढसंशोधन अशामध्ये रुचि असेल त्यांना त्यांच्या कार्यात यश मिळू शकेल. राहूमुळे शत्रूपासून रक्षण होईल पण वैवाहिक जीवनात थोडी बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. जपा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात मंगळ व शुक्र हे दोन ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असण्याची शक्यता आह; तर रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धातच प्रतिकुल असेल. नेपच्यूनमुळे आर्थिक बाबतीत घोटाळे, आर्थिक फ़सवणूक, अर्थप्राप्तीत विलंब, अनपेक्षित आर्थिक जबाबदारी स्वीकारावी लागणे अशा प्रकारच्या घटना घडणे शक्य आहे. या राशीच्या तृतीय स्थानी असलेला हर्षल उच्च बौद्धिक व उच्च शास्त्रीय संशोधन कार्यात रत असणारांना प्रगतीकारक व यशदायक होईल. तसेच या राशीच्या काहींना परदेशगमनाचे योग येतील. गुरुमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, गृहसौख्य मिळेल; पण नातेवाईकांकडून त्रास होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या काहीजणांचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार यशस्वी होतील. दाम्पत्यजीवनात दोघांपैकी एकाचे अनारोग्य, मतभेद, कटकटी यांमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच कोर्ट प्रकरणे असतील तर त्यात अपयश येण्याची शक्यता आहे. या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी गैरसमज, संशय अशापैकी कारणांनी भागीदारी तुटणार नाही याची काळजी घ्यावी. शासकीय, निम-शासकीय नोकरीत असणारांना महिन्याच्या पूर्वार्धात रवि ग्रह

प्रतिकुल असेल; पण महिन्याच्या उत्तरार्धात तो अनुकुल होईल. त्यामुळे नव्या ओळखी होतील, त्यातून काही लाभदायक घटना घडतील, प्रतिष्ठा वाढेल, इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. पण शुक्र प्रतिकुल असल्यामुळे कला, छंद, फ़ोटोग्राफ़ी अशा प्रकारच्या कलत्मक नोकरी-व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होतील व नैराश्य येईल.  जपा.

**(११) कुंभ** - या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात गुरु-शुक्र व काही प्रमाणात बुध अनुकुल असणार आहेत. इतर सर्व ग्रह प्रतिकुल अनुभव देणारे असेच सिद्ध होतील. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या गुरुमुळे या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. काहींना प्रवासाचे, तीर्थयात्रेचे योग संभवतात. पण भावंडसुखात बाधा येणे संभवते. जपा. शुक्रामुळे चांगल्या सज्जन लोकांचा सहवास लाभेल;  तर काहींना गुरुकृपा प्राप्त होईल .काहींचे कर्तृत्व प्रकाशात येऊन त्यांना कीर्ती लाभेल. रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून त्यामुळे मनस्ताप व दु:ख होणे, शारीरिक अनारोग्य होणे, वाद, भांडणे होणे, नोकरीत वरिष्ठांशी मतभेद होणे, मन व बुद्धीवर ताण येणे, वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागणे अशा प्रकारचे त्रास सहन करावे लागण्याची शक्यता आहे. या राशीच्या दशम स्थानी असलेला राहू नोकरी-व्यवसायास अनुकुल असेल व काहींना सन्मान मिळवून देईल तर काहींना सत्ता, अधिकार प्राप्त होईल. पण सध्या या राशीच्या मंडळींचे मन अतिशय कोमल व शीघ्र संवेदनात्मक झाले असल्याने मनाविरुद्ध थोडे काही घडले तरी लगेच नैराश्य येईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या केतुमुळे फ़ारसे कोणाशी पटणार नाही. तसेच कसली तरी चिंता सतावेल. विषभय आहे. जपा. या राशीच्या धनस्थानी असलेल्या हर्षलमुळे या राशीच्या मंडळींचे मन व बुद्धी अस्थिर, चंचल होईल व अविचाराने खर्च केला जाण्याची शक्यत्ता आहे. तसेच विक्षिप्त आचरण होण्याची शक्यता आहे. मंगळ अनारोग्यकारकच असेल व काहींना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागेल. चोरी, फ़सवणूक यांमुळे आर्थिक हानी होणे संभवते. जपा.

**(१२) मीन** - या राशीच्या मंडळींचे मन अत्यंत कोमल, त्वरित नैराश्य येनारे असे झाले असण्याची शक्यता आहे. पण प्रथम स्थानी असलेल्या हर्षलमुळे स्वभाव मात्र  अतिशय अस्थिर, लहरी, चंचल व विक्षिप्त असा झाला असण्याची शक्यता दिसते. असे असले तरी हा हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यास उपयुक्त होईल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे कुटुंबात शुभ घटना घडतील. व्यापार-व्यवसाय यांत प्रगती व वाढ होईल. अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होणे संभवते. राहूमुळे कौटुंबिक सुखात बाधा येण्याची शक्यता आहे. घरात वाद, भांडणे होतील. या राशीच्या ज्या मंडळींना अध्यात्मात रस असेल त्यांना उपासनेद्वारा मनस्वास्थ्य लाभेल. या राशीच्या पंचम स्थानी असलेला मंगळ संततिसुखाचे दृष्टीने तापदायक होईल. मुले मनाविरुद्ध वागण्याची शक्यता आहे. या राशीची लहान मुले अत्यंत हूड व व्रात्य असण्याची शक्यता दिसते. शिवाय मुलांच्या अनारोग्याचा त्रासही या राशीच्या मंडळींना सहन करावा लागेल. जपा. दांपत्यजीवनात पतिपत्नीत वाद, मतभेद, कोणाचे तरी आजारपण, कोणास लागलेली कुसंगती अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लगण्याची शक्यता आहे. जपा. बुध-शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील, विविध प्रकारचे लाभ होतील व होणारा मनस्ताप सुसह्य होईल.

=====00000=====